वृत्तरत्न सम्राट
सामान्य जनांचा बुलंद आवाज
संपादक : बबन कांबळे

# प्रेरणा देशभ्रतार यांनी स्विकारला बार्टी महासंचालकपदाचा कार्यभार

पुणे, दि. ३- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे या संस्थेच्या महासंचालकपदी प्रेरणा देशभ्रतार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बार्टीचे महासंचालक कैलास कणसे (भा.पो.से) हे दिनांक ३१ ऑगस्ट २०२० रोजी सेवानिवृत्त झाले. या पदाचा अतिरिक्त कार्यभार प्रेरणा देशभ्रतार (आयुक्त, दिव्याग कल्याण, पुणे) यांच्याकडे सोपविण्यात आला. अतिरिक्त महासंचालक बार्टी या पदाचा कार्यभार प्रेरणा देशभ्रतार यांनी दिनांक २ सप्टेंबर २०२० रोजी



स्विकारला. बार्टी मुख्यालय, पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून महासंचालकपदाचा कार्यभार त्यांनी स्विकारला. बार्टी सभागृह येथे बार्टीचे निंबधक यादव गायकवाड, अतिरिक्त समाज कल्याण आयुक्त पुणे दिनेश डोके यांनी महासंचालक यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. पदभार स्विकारल्यानंतर महासंचालक प्रेरणा देशभ्रतार यांनी बार्टीतिल विविध योजना व उपक्रमचा आढावा घेतला. यावेळी महासंचालक यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे २१ खंड तात्काळ उपलब्ध करावे व ते वाचकांसाठी ऑनलाईन असावे. तसेच भंदत आनंद कौशल्यन यांचे हिंदीतिल जाथक कथा मराठीत भाषांतर करून उपलब्ध करावे. सामाजिक समतेवर आधारित पुस्तके व भारतीय संविधानाची ओळख लहान मुलांना, विद्यार्थयांना होण्यासाठी पुस्तके उपलब्ध करावित, यशदाच्या धर्तिवर बार्टी कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात यावे, स्पर्धा परीक्षा एमपीएससी, युपीएससी ग्रंथालयाचा आढावा घेतला. बार्टीचे चॅनेल सुरु करणे, सफाई कामगारांच्या मुला मुलींची निवासी शाळा येरवड़ा, जातपड़ताळणी समित्यांच्या आढावा, प्रेरणा देशभ्रतार यांनी घेतला. या आढावा बैठकिला बार्टीतील सर्व विभागाचे प्रंकल्प संचालक उपस्थित होते.